क्रमांक : संकीर्ण-02/2018/23

# - घोषणा -

## आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये ईमेल आयडी, मोबाईल नंबर व उंची/छाती/वजन चे दावे बदलण्यासंदर्भात.

आयोगाच्या **www.mahampsc.mahaonline.gov.in** या ऑनलाईन अर्जप्रणालीद्वारे उमेदवारांनी तयार केलेल्या प्रोफाईलमध्ये उमेदवारांना त्यांची वर्गवारी, शैक्षणिक अर्हता व अनुभव याव्यतिरिक्त अन्य माहिती बदलण्यास मुभा देण्यात आलेली नाही. उमेदवारांना आपल्या प्रोफाईल मधील माहिती जसे ईमेल आयडी, मोबाईल नंबर इत्यादी बदल करावयाचे असल्यास उमेदवारांच्या निवेदन / ईमेल आधारे आयोगाच्या कार्यालयाच्या स्तरावर सदर दावे बदलून देण्यात येतात. तथापि, सद्यस्थितीला राज्यसेवा पूर्व परीक्षा-२०१९ ची जाहिरात विज्ञापित करण्यात आली असल्याने सदर दावे बदलण्याबाबत मोठया प्रमाणावर उमेदवारांचे ईमेल/निवेदने आयोगास प्राप्त होत आहेत. सदर बाब विचारात घेता, उमेदवारांना त्यांचे ईमेल आयडी, मोबाईल नंबर व उंची/छाती/वजन चे दावे त्यांच्या स्तरावर **जाहिरात क्रमांक : ५०/२०१८- राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०१९** च्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत ऑनलाईन प्रणालीद्वारे उमेदवारांच्या स्वत:च्या जबाबदारीवर बदलण्यास मुभा देण्यात येत आहे.

ज्या उमेदवारांना उपरोक्त दाव्यात बदल करायचा आहे, त्यांनी आपल्या स्तरावर दावे बदलून घ्यावेत. **मात्र, असे बदल करताना कोणत्याही परिस्थितीत उमेदवार खोटी व दिशाभूल करणारी माहितीचा अंतर्भाव करणार नाहीत, याची खबरदारी उमेदवारांनी घ्यावी. (एका उमेदवाराचे एकापेक्षा जास्त प्रोफाईल तयार होणार नाहीत, याची दक्षता घेणे अत्यावश्यक आहे.)**

दिनांक : २८ डिसेंबर, २०१८

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग